क्रमांक : प्रविस्था-३(२०१०)/मा.अ.नियुक्ती/का-१ /१९२९ प/५३
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन,
१७ वा मजला, मंत्रालयासमोर,
मुंबई ४०० ०३२
दिनांक 23 APR 2010

संदर्भ : (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, शासन परिपत्रक क्र.ममाअ/२००२/प्र.क्र.१२७/२/५, दिनांक १४ ऑगस्ट, २००३
(२) महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ११.८.२००३ मधील भाग, क्र.४ मधील कलम क्र.५ (१)
(३) शासन निर्णय, क्रमांक-माजग-१०९८/७६/प्र.क्र.२१/९८/३४-अ, दि. ९.७.२००२
(४) कार्यालयीन आदेश, क्र-प्रविस्था-२७(२००३)/का-१/२२७९, दि.२९.९.२००३
(५) केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, दिनांक १२ ऑक्टोबर, २००५

## कार्यालयीन आदेश

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, महाराष्ट्रासह सर्व देशभर दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ पासून लागू झालेला आहे. परिणामी, दिनांक ११ ऑगस्ट, २००३ पासून राज्यात लागू झालेला महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ आता निरसीत झाला आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कारभाराची योग्य व अचूक माहिती जनतेला सहजरित्या उपलब्ध व्हावी, याकरीता महासंचालनालयाने संदर्भ क्रमांक ४ अनुसार जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जांची, अपिलांची व्याप्ती पाहता तसेच विहित मुदतीत अर्ज निकाली काढण्याकरीता कार्यालयीन कामकाजाच्या वाटपाप्रमाणे स्वतंत्र अपिलीय अधिकारी तसेच शाखानिहाय जन माहिती अधिकारी, सहायक जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ अनुसार कार्यालयीन कामकाजाच्या वाटपाप्रमाणे संचालक (माहिती) (प्रशासन) यांच्या अखत्यारित ज्या बाबी येतात, त्यासाठी संचालक (माहिती) (प्रशासन) हे अपिलीय अधिकारी असतील तर संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) यांच्या अखत्यारित ज्या बाबी येतात, त्यासाठी संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) हे अपिलीय अधिकारी असतील.

तसेच याद्वारे महासंचालनालयाच्या सर्व शाखाप्रमुखांची जन माहिती अधिकारी आणि संबंधित शाखेमधील कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी (अधीक्षक/सहायक अधीक्षक) यांची सहायक जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. तेव्हा सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडून जन माहिती अधिकारी तसेच सहायक जन माहिती अधिकारी म्हणून काम पहावे.

मा.महासंचालक महोदयांच्या मान्यतेने.

23 APR 2010

संचालक (माहिती) (प्रशासन)

प्रति,
१. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ३२
२. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ३२
३. सर्व संबंधित शाखाप्रमुख/कर्मचारी (अधीक्षक-सहायक अधीक्षक)

प्रत सादर अग्रेषित,
मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०००३२